# ज. ए. इ. ची प्राथमिक शाळा

## सुभेदार वाडा, कल्याण (प.)

## * वार्षिक अहवाल *

### सन २०१९-२०

सस्नेह नमस्कार,

जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटची प्राथमिक शाळा, सुभेदार वाडा, गांधी चौक, कल्याण (प.) सन २०१९-२० चा आपला वार्षिक अहवाल सादर करीत आहे.

जून १९८५ साली ज. ए. इ. ची प्राथमिक शाळा सुरू झाली.

* सध्या आपल्या शाळेत एक मुख्याध्यापिका, १६ वर्गशिक्षिका, १ सेविका तसेच संस्था पातळीवर १ संगीत शिक्षिका, २ जादा शिक्षिका, २ लेखनिक व ५ सेविका कार्यरत असून शाळेच्या १० वर्ग खोल्या, १ प्रशस्त हॉल, स्वच्छतागृह, पाण्याचे कुलर, खेळाचे मोठे मैदान, संगणक कक्ष या सर्वांचा लाभ एकूण ८३८ विद्यार्थी घेत आहेत.शिवायसुरक्षिततेच्यादृष्टीनेसी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले आहेत.
* गेल्या ८ वर्षापासून आपल्या शाळेत इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना संगणकाचे शिक्षण दिले जाते. इ. १ ली ते ४ च्या तीन तुकड्यांमध्ये सेमी इंग्रजीचे माध्यमातून शिक्षण दिले जाते आणि प्रत्येकी एक वर्ग मराठी माध्यमाचा घेतला जातो. शाळेत ई-लर्निंगच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकविले जाते.
* दि. ३१ मे २०१९ रोजी शासनाच्या नियत वयोमानानुसार सौ. प्रज्ञा मोने बाई निवृत्त झाल्या. त्यामुळे दि. १ जून २०१९ पासून श्रीमती नेहा कुलकर्णी बाईंनी प्रभारी मुख्याध्यापिका म्हणून पदभार स्वीकारला.
* * दि.१३जून२०१९पासूनसन२०१९-२०चे शैक्षणिक वर्ष सुरू झाले. मा. मुख्याध्यापिका श्रीमतीकुलकर्णीबाईयांनी इ.१लीच्याविद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. तसेच इ. १ ली ते ४ थी च्या सर्व विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तके वाटण्यात आली.
* स्वच्छ मिशन अंतर्गत चित्रकला स्पर्धा तसेच 'प्रभातफेरी' दि. १२/१/२०१९ रोजी काढण्यात आली.
* रविवार दि. २०/१/२०१९ रोजी 'गणित प्रज्ञा शोध परीक्षा' इ. २ री तसेच ३ री व ४ थी ची M.P.S. परीक्षा घेण्यात आली.
* मंगळवार दि. २२/१/२०१९ रोजी मुलांना संस्थेकडून वार्षिक अल्पोपाहार देण्यात आला. त्याच दिवशी तीळगूळ समारंभ साजरा झाला.
* संभाजीनगर मित्रमंडळ आयोजित पोवाडा म्हणणे व वेशभूषा स्पर्धा घेण्यात आल्या. त्यावेळी पोवाडा म्हणणे या स्पर्धेत कु. मयुरेश चौधरी इ. ४ थी क व कु. प्रसाद आव्हाड इ. ४ थी क यांना प्रमाणपत्र व शाळेला स्मृतिचिन्ह देण्यात आले. वेशभूषा स्पर्धेत कु. कल्पेश संतोष धामणकर इ. १ ली अ व कु आर्यन निलेश बोडके हे क्रमश: प्रथम व द्विथीय क्रमांक पटकावून आले.
* चिन्मय गीतापठण स्पर्धेत कु. चैत्राली भूषण जठार इ. ३ री अ हिला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.
* बुधवार दि. ६/२/२०१९ रोजी इ. १ ली ते ४ थी ची शैक्षणिक सहल वज्रेश्वरी येथे जाऊन आली.
* दि. १०/२/२०१९ रोजी महाराष्ट्र ज्ञानपीठाची इंग्रजी विषयाची इ. ३ री व ४ थी ची परीक्षा घेण्यात आली.

* दि. १४/२/२०१९ रोजी एन्. टी. केळकर स्मृति चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.
* शनिवार दि. १५/२/२०१९ रोजी पालक-शिक्षक संघातर्फे इ. १ली ते ४ थी च्या सर्व विद्यार्थ्यांच्या स्पर्धा घेण्यात आल्या.
* कै. नारायण अच्युत जावडेकर स्मृतिप्रीत्यर्थ संस्थेने आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेत शाळेतील सहा. शिक्षिका श्रीम. प्रियदर्शनी पष्टे यांना द्वितय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.
* दि. १८/२/२०१९ रोजी संस्थेच्या मो. ह. विद्यालय, ठाणे येथे झालेल्या श्री. श्री. ज. बापट वक्तृत्व स्पर्धेत प्राथमिक गट क्र. १ मध्ये कल्पेश संतोष धामणकर (१ ली अ), कु. वैभवी गजानन गायकवाड (२ री अ) यांना प्रथम क्रमांक मिळाला. तर गट क्र.२ मध्ये कु. संजना संतोष धोंगडे हिला पारितोषिक मिळाले. तसेच सुभेदारवाडा शाळेला ढाल मिळाली.
* दि. २४/२/२०१९ रोजी शाळेत इ. ८ वी स्कॉलरशिपची परीक्षा घेण्यात आली.
* दि. २५/२/२०१९ रोजी इ. ३री व ४ थी ची गणित विद्यापीठ परीक्षा घेण्यात आल्या.
* दि. २७/२/२०१९ रोजी मराठी राजभाषा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.
* दि. १६/३/२०१९ रोजी कै. गो. ना. अक्षीकर यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.
* दि. १९ मार्च २०१९ रोजी इ. ४ थी चा निरोप समारंभ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.
* दि. २३/३/२०१९ रोजी पालक-शिक्षक संघातर्फे परितोषिक वितरण सोहळा मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला.
* M.P.S.P. परीक्षेत कु. वरद संतोष चव्हाण ३ री ब ३०० पैकी २१६ गुण मिळवून राज्यात गुणवत्ता यादीत १६७ वा आला. तसेच ४ थी अ मधून कु संजना संतोष धोंगडे ३०० पैकी २१६ मिळवून राज्यात १८२ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली. इ. २ री च्या M.P.S.P. परीक्षेत कु.धीरज संदीप वायकुळ इ. २ री अ १०० पैकी ९४ गुण मिळवून राज्यात ५१ वा आला.
* दि. २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योगदिन म्हणून साजरा करण्यात आला. योगतज्ज्ञ सौ. मनिषा धोपटकर व सौ. आशा पाटील यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्व सांगून काही प्रात्यक्षिके करून घेतली.
* दि. २६/९/२०१९ रोजी सौ. प्रज्ञा मोने बाई यांच्या सदिच्छा समारंभ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.
* दि. १ जुलै रोजी वृक्षारोपण समारंभ केला. शाळेच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले.
* दि. ६/७/२०१९ रोजी पालक सभा घेण्यात आली. सभेत वार्षिक अभ्यासक्रम शालेय उपक्रम शाळेची शिस्त, स्पर्धा, स्पर्धा परीक्षा याविषयी माहिती देण्यात आली.
* स्कूल हेल्थ एन्युअल रिपोर्ट प्रोग्राम यांच्या सौजन्याने SHARP NGO च्या स्ट्रेट कोऑर्डिनेटर ऑफ महाराष्ट्र यांच्या तर्फे विद्यार्थ्यांना बूट वाटप करण्यात आले. हे वाटप कु. आरती ककड यांच्या हस्ते झाले.
* इंग्रजी मॅरेथॉन परीक्षेत कु. निरली प्रदीप राणे इ. ३ री क हिने ५० पैकी ४३ गुण मिळवून राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला. तर इ. ४ थी मधून कु. संजना संतोष धोंगडे व कु. दुर्वा कुणाल पाठक यांनी प्रत्येकी ५० पैकी ४६ गुण मिळवून राज्यात तिसरा क्रमांक पटकाविला.
* संगणक ऑनलशाईन परीक्षेत कु. वीर मधुकर तांडेल (३ री क) याने पारितोषिक प्राप्त केले.
* मराठा मंदिर ज्ञानपीठ तर्फे घेण्यात येणाऱ्या यंदाच्या गणित विषयाच्या परीक्षेचा निकाल व इ. इंग्रजी विषयाच्या परीक्षेचा निकाल इ. ३ री, ४ थी चा १००% लागला.
* मंगळवार दि. १६ जुलै २०१९ रोजी इ. १ ली ते ४ थी च्या सर्व

विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमा साजरी केली.

* दि. ३१ जुलै रोजी दीप अमावस्येनिमित्त 'दीपपूजा' आयोजित केली होती.
* १ ऑगस्ट २०१९ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी करण्यात आली. वर्ग पातळीवर विद्यार्थ्यांची बौद्धिक स्पर्धा घेऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात आले.
* दि. ६ ऑगस्ट रोजी नागपंचमी हा सण साजरा करण्यात आला.
* दि. ६ ते दि. ९ ऑगस्ट या कालावधीत इ. १ ली ते ४ थी ची चाचणी परीक्षा घेण्यात आली.
* दि. १४ ऑगस्ट रोजी 'रक्षाबंधन' हा सण साजरा करण्यात आला.
* गुरुवार दि. १५ ऑगस्ट रोजी भारताचा ७३ वा 'स्वातंत्र्यदिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.
* दि. २३ ऑगस्ट २०१९ रोजी 'दहिहंडी' हा उत्सव मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला.
* कु. मोहित हेमंत वेरूळकर याला बुद्धिबळ स्पर्धेत कल्याण तालुक्यामधून बेस्ट टीम कप मिळाला. महाराष्ट्र स्टेट ओपन सिलेक्शन इंटरनॅशनल फाईड रेटिंग चेस टुर्नामेंटमध्ये सहभाग.
* दि. २९ ऑगस्ट रोजी Fit India Movement हे श्री. नरेंद्र मोदी यांचे भाषणाचे थेट प्रक्षेपण सर्व विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. याच दिवशी महाराष्ट्रातील सण व उत्सव हा माहितीपट दाखविण्यात आला.
* कॅमलिन तर्फे चित्रकला स्पर्धा व कागदी बॅग बनविणे हा उपक्रम राबविण्यात आला. बालक मंदिर तर्फे झालेल्या जिल्हास्तरीय आंतरशालेय स्पर्धेत कु. दीप्ती संदीप धामणकर इ. ३ री क हिने सुंदर हस्ताक्षर स्पर्धेथ प्रथम क्रमांक पटकाविला तर रंगभरण स्पर्धेत कु. देवश्री शेखर अरुणावतीकर २ री अ व कु. अस्मिता ज्ञानदेव मोहिते ४ थी अ यांनी उत्तेजनार्थ पारितोषिके पटकाविली.
* पालक-शिक्षक संघातर्फे दि. ३० ऑगस्ट रोजी मातृदिनानिमित्त माता पालकांची स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धा होती उलट उभे राहून बादलीत चेंडू टाकणे. या स्पर्धेत पुढील स्पर्धक विजयी झाले. - सौ. अनिता नितीन भोईर (प्रथम), सौ. रेश्मा मधुकर तांडेल (द्वितीय), सौ. कोमल शिवशंकर सिंग (तृतीय).
* सार्वजनिक गणेशोत्सव सुभेदार वाडा मंडळातर्फे दि. २ सप्टेंबर ते १२ सप्टेंबर पर्यंत गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यंदा या मंडळाला १२५ वर्षे पूर्ण झाली. या निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजनकरण्यातआले.सुभेदारवाडागणेशोत्सव मंडळातर्फे चित्रकला स्पर्धाप्राथमिकविभागासाठी घेण्यात आली. या स्पर्धेत कु. वेदिका नीळकंठ पिल्लेवार इ. २ री अ हिने प्रथम क्रमांक पटकाविला.
* बुधवार दि. ११ सप्टेंबर रोजी शाळेत मोठ्या उत्साहात शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त शिक्षकांची शब्दसाखळी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेतील विजयी स्पर्धक - सौ. चारुशिला अ. वंडेकर (प्रथम), सौ. कल्पना सं. पोतदार (द्वितीय), सौ. सुकेशिनी शि. वाघमारे (तृतीय), सौ. गायत्री प्र. भामरे (तृतीय).
* 'स्वच्छ भारत अभियाना'तर्फे दि. २ सप्टेंबर २०१९ ते १४ सप्टेंबर २०१९ पंधरवडा साजरा करण्यात आला. दि. ९ सप्टेंबर रोजी स्वच्छता शपथ दि. ११ सप्टेंबर रोजी निबंध स्पर्धा, हात धुणे व चित्रकला स्पर्धा दि. १३ सप्टेंबर परिसर स्वच्छता इ. अशा विविध उपक्रमांनी पंधरवडा उत्साहात साजरा करण्यात आला.
* मंगळवार दि. १७ सप्टेंबर २०१९ रोजी इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांनी श्री. संत राममारुती मंदिरात अथर्वशीर्षाचे पठण केले.
* L.I.C. तर्फे रंगभरण स्पर्धा आयोजित करण्यात आली.

* या वर्षीचा Student of the Year मान इ. ३ री अ चा विद्यार्थी कु. धीरज संजय वायकूळ याला मिळाला.
* दरवर्षीप्रमाणे दि. २५ सप्टेंबर या दिवशी संस्थेचे संस्थापक कै. गो. ना. अक्षीकर यांची जयंती साजरी करण्यात आली. तसेच हे औचित्य साधून पारितोषिक वितरण करण्यात आले. इ. १० वी व इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांचे सत्कार 'नेने ढाल' व 'अग्रवाल ढाल' ही पारितोषिके विद्यार्थ्यांना प्रदान करून विद्यार्थी व शिक्षकांना गौरविण्यात आले. यंदा आपल्या हायस्कूल कल्याण शाळेला 'नेने ढालीचा' मान मिळाला. व शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल सर्वाधिक लागल्याने 'सुशांत वैद्य ढाल'ही आपल्याच शाळेला मिळाली.
* दि. १ ऑक्टोबर रोजी शाळेत 'भोंडला' हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रुचकर खिरापत आणि खाऊचे वाटप करण्यात आले.सौ. फिरके बाईंनी खाऊसाठी मदत केली. याच दिवशी स्काऊट गाईडच्या बुलबुल पथकाने दुर्गाडी किल्ल्यातील मंदिरात चप्पल स्टँडजवळ सेवा दिली.
* दि. १ ऑक्टोबर रोजी 'चिन्मय मिशन' तर्फे गीतापठण स्पर्धेची प्रथम फेरी घेण्यात आली.
* १५ ऑक्टोबर रोजी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना वाचन, स्वच्छता, चांगल्या सवयींचे महत्त्व पटवून देण्यात आले.
* दि. १५ ऑक्टोबर ते दि. १८ ऑक्टोबर या कालावधी प्रथम सत्रांत परीक्षा घेण्यात आली.
* दि. १४ ऑक्टोबर रोजी बालदिनानिमित्त इ. १ ली साठी बडबडगीते, इ. २ री साठी गोष्टी आणि इ. ३ री व ४ थी साठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.
* 'मुलांचे हक्क व सुरक्षितता या बाबत जाणीव, जागृती उपक्रम समाह' दि. १४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर या कालावधीत साजरा झाला. आनंददायी खेळ व छंद वर्ग आयोजित केले होते. पालक सभेत मुलांच्या हक्क आणि संरक्षण याबाबत चर्चा केली. चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या.
* दि. २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिन म्हणून साजरा केला. दि. २६ नोव्हेंबर ते दि. २ डिसेंबर २०१९ या कालावधीत शालेय स्तरावर विविध कार्यक्रम राबवून साजरा करण्यात आला. इ. ३ री व इ. ४ थी साठी प्रभातफेरी, वक्तृत्व स्पर्धा तसेच निबंध स्पर्धा इ. १ ली व इ. २ री साठी गीतगायन स्पर्धा घेतली.

पालक-शिक्षक संघ व शाळा व्यवस्थापन समितीतील पालक प्रतिनिधींचे शाळेच्या प्रगतीसाठी वेळोवेळी साहाय्य लाभते.

शाळेच्या प्रेमापोटी सर्व हितचिंतक, आजी - माजी पालक, शाळेच्या प्रगतीसाठी उत्तम प्रकारे सहकार्य करतात. शाळा सर्वांची ऋणी आहे.

अशा विशाल वटवृक्षाला समृद्धी आणि यशाच्या उत्तुंग शिखराकडे वाटचाल करण्यासाठी, संस्था, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व आपले बालगोपाळ सतत प्रयत्नशील असतात. त्यांना सुयश मिळो ही ईश्वरचरणी प्रार्थना!

धन्यवाद!

**श्रीमती नेहा नि. कुलकर्णी**
मुख्याध्यापिका
ज.ए.इ.ची प्राथमिक शाळा,
सुभेदार वाडा, कल्याण (प.)

संकलन : **सौ. प्रेरणा सु. लोखंडे**
(सहा. शिक्षिका)